प्रा.डॉ.सौ.विमल केशवराव पाटील
मराठी विभाग प्रमुख,
छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा
(महाराष्ट्र)
पिन कोड क्र.415 001

---

## प्रमाणपत्र

श्री.शरद राजाराम गायकवाड यांनी "शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा" आणि "घमांडी" या कादंबऱ्यांचा अभ्यास" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने हा लघु–शोध–प्रकल्प प्रबंधरूपाने स्वतःच पूर्ण केला आहे.हा लघु–शोध–प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे हे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते.

स्थळ : सातारा

दिनांक : २९|६|१९९९

**प्रा.डॉ.सौ.विमल केशवराव पाटील**

मार्गदर्शिका

---

PRINCIPAL M.K. YADAV

CHH. SHIVAJI COLLEGE, SATARA

(MAHARASHTRA)

---

## CERTIFICATE

This is to certify that Mr.Sharad Rajaram Gaikwad, was a regular student of M.Phil (Marathi) during the academic year 97-98 and 98-.99. To the best of my knowledge he bears a good moral character.

CHHATRAPATI SHIVAJI COLLEGE SATARA

Principal,

Chh.Shivaji college, Satara

Place : SATARA

Date : 23, June, 1999

---

## प्रतिज्ञापत्र

"शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा" आणि "घमांडी" या कादंबऱ्यांचा अभ्यास" या विषयावरील लिहिलेला लघु शोध प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. पदवीसाठी सादर केलेला आहे. हा लघु शोध प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्य कोठेही अथवा कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

Gaikwad.

(श्री.शरद राजाराम गायकवाड)

स्थळ : सातारा

दिनांक : २९/६/१९९९.

# प्रास्ताविक

"शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा" आणि घमांडी" या कादंबऱ्यांचा अभ्यास" हा विषय एम्.फिल. च्या लघु शोध प्रबंधासाठी निवडण्यामागे मा.विश्वनाथ शिंदे, मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, तसेच मार्गदर्शिका आदरणीय प्रा.डॉ.सौ.विमल केशवराव पाटील यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच हा विषय निश्चित केला.

इ.स.पूर्व तत्कालीन कुटील कारस्थानातून निर्माण झालेल्या समाजव्यवस्थेचा बळी ठरलेल्या "दलित" समाजात मी जन्माला आलो. "दलित" म्हणून जन्माला आल्याने माझ्या दलित समाजातील पूर्वजांची युगानुयुगांची दुःखे, त्यांच्या हाल अपेष्ठा, उपेक्षा व अवहेलना, त्यांचे अज्ञान त्यांच्यातील अंधःश्रध्दा, व्यसनाधिनता, जटील रूढी, प्रथा-परंपरा आणि दरिद्री व अपमानित पशुतुल्य जीवनाचा मी बालपणापासून स्वतः काही अंशी अनुभव घेतला. त्यामुळे साहजिकच दलित साहित्याची मनामध्ये आवड निर्माण झाली. माझ्याच जातीत जन्माला आलेल्या अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या लेखनाने मला आकर्षित करून घेतले. अण्णाभाऊंना लोकमान्यता मिळून ते लोकप्रिय साहित्यिक बनले. मात्र प्रचंड प्रमाणात साहित्य प्रपंच उभारूनही काळाच्या ओघात शंकर भाऊ साठे मात्र अंधारात उपेक्षित राहिले. शंकरभाऊंशी असलेल्या माझ्या नात्याच्या संबंधामुळे शंकरभाऊंच्याबद्दल माझ्या मनातील आदर द्विगुणीत होत गेला आणि शंकर भाऊंच्याच साहित्यावर लघु-शोध-प्रबंध लिहिण्याचे मनाशी ठरविले व आज त्या कामाला पूर्णत्व आले.

माझ्या या लघु-शोध-प्रबंधासाठी मला माझ्या महाविद्यालयीन शिक्षिका प्रा.डॉ.सौ.विमल केशवराव पाटील या मार्गदर्शिका म्हणून लाभल्या. त्यांनी केलेल्या वेळोवेळीच्या सूचना व त्यांचे अनमोल असे मार्गदर्शन यामुळेच माझा हा लघु-शोध-प्रबंध मला पूर्ण करता आला. त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणेच मला उचित वाटते.

या लघु–शोध–प्रबंधाचा अभ्यास करताना माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा.के.यादवसो तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील श्री.पावसकर व त्यांचे सहकारी, सातान्यातील "नगर वाचनालय" याचे कर्मचारी यांचेही विशेष सहकार्य लाभले त्याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहे.

प्रा.डॉ.आ.ह.साळुंखे, लक्ष्मण माने, पार्थ पोळके, प्रा.शशिकांत तासगांवकर, प्रा.डॉ.बाबुराव गुरव, प्रा.डॉ.रघुनाथ केंगार, प्रमोद कोपर्डे या साहित्यिक व अभ्यासक जाणकार मान्यवरांनी मला वेळोवेळी केलेल्या सूचना व त्यांनी केलेले सहकार्य यामुळेच माझे हे लघु–शोध प्रबंधाचे काम पूर्ण झाले. त्याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

मला माझ्या अभ्यासाला सातत्याने प्रोत्साहन देणारे माझे मित्रबंधू राजेंद्र कणसे, प्रकाश वायदंडे, दादासो कणसे त्याचप्रमाणे माझे आईवडील, माझी पत्नी सौ.राजश्री, स्नेही प्रा.सुभाष माने आणि माझ्यावर पुत्रवत प्रेम करणारे आदरणीय शिवाजीराव जाधवसो या सर्वांचा मी आभारी आहे.

या लघु–शोध–प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन व बांधणी करून देणारे **मे.रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग**, सातारा चे श्री.मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी श्री.राजू कुलकर्णी यांचाही मी आभारी आहे.

SGaikwad.
(श्री.शरद राजाराम गायकवाड)

स्थळ : सातारा

दिनांक : २९।६।१९९९.

---

# भूमिका

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेत मी माध्यमिक स्तरापासून ते एम.ए. पर्यंतचे सर्व शिक्षण घेतल्याने याच रयत शिक्षण संस्थेच्या विशिष्ठ संस्काराने मला एक नवा सामाजिक दृष्टिकोन दिला. म.गौतमबुध्द, महात्मा ज्योतिराव फूले, राजर्षि छत्रपती शाहु, डॅा.बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे या महात्म्यांच्या जीवनचरित्राचा व त्यांनी केलेल्या मानवतावादी कार्याचा, त्यांच्या तत्वज्ञानाचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला आणि मी दलित साहित्याकडे आकर्षित झालो.

दलित साहित्याचे वाचन करत असतानाच फक्त दिड दिवस शालेय शिक्षण झालेले अण्णाभाऊ स्वत:'अक्षरशत्रू'असतानाही पुढे त्यांनी अक्षर वाङ्‌मयाची निर्मिती केली. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांचा सुरेख संगम म्हणजे अण्णाभाऊ असे माझे मत बनले. अण्णाभाऊ विषयी अधिक माहिती वाचत असतानाच "माझा भाऊ अण्णा भाऊ" हे अण्णा भाऊंच्या जीवनावर त्यांचेच कनिष्ठ बंधू शंकर भाऊ साठे यांनी लिहिलेले आत्मकथात्मक चरित्र माझ्या हाती पडले.

एकाच मातापित्यांच्या पोटी अण्णा भाऊनंतर जन्माला आलेल्या शंकर भाऊ साठे या अण्णा भाऊंच्या पाठच्या सख्या भावाबद्दल मनामध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली. एका झपाटलेल्या अवस्थेत "समग्र शंकरभाऊ" वाचून काढले. आणि अण्णाभाऊसारख्या उच्च प्रतिच्या साहित्य सम्राटाचाच साहित्यिक वारसा पुढे चालवणाऱ्या शंकरभाऊंची इ.स.1995 मध्ये मी समक्ष भेट घेतली. भेटीअंती शंकर भाऊ हे माझे नातेवाईक असल्याचेही मला समजल्याने माझ्या मनातील त्यांच्या विषयीचा आदर द्विगुणीत झाला. पुढे शंकरभाऊ हे माझे एक कुटुंबियच बनले.

विसाव्या शतकाच्या पूर्वाधातील कालखंड असल्याने त्यावेळी जातीव्यवस्था बळकट होती. त्यामुळे वर्गाच्या बाहेरचे शिक्षण घेणे बाल शंकरच्या नशिबी आलेले होते. वर्गाच्या बाहेर बसून फक्त पंधरा (15) दिवसांचे अल्पशिक्षण घेतलेले शंकरभाऊ हे "शब्दशत्रू" असून देखील पुढील काळात त्यांनी जी साहित्य निर्मिती केली त्यामुळे ते "शब्द प्रभू" ठरले.

अण्णा भाऊ साठे यांच्या पश्चात सुमारे इ.स.1980 च्या दरम्यान आपल्या साहित्य लेखनाला सुरूवात करणाऱ्या शंकर भाऊंनी आपल्या मृत्यूपर्यंतच्या अवघ्या सोळा वर्षाच्या आयुष्यातील उत्तरार्धाच्या अंतिम कालखंडात एक आत्मकथनात्मक चरित्र, बारा प्रकाशित कादंबऱ्या आणि तीन अप्रकाशित कादंबऱ्या अशी प्रचंड साहित्य निर्मिती करून अण्णा भाऊंचा साहित्यिक वारसा शंकर भाऊंनी शेवटपर्यंत चालविला.

साधारण विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सातारा, सांगली, आणि कोल्हापूर या परिसरात घडलेल्या सत्यघटना-प्रसंगावर आधारीत शंकरभाऊंनी आपले कादंबरी वाड्.मय लिहिले. न्यायाची चाड, आणि अन्यायाची चीड असणारे, न नांदवणाऱ्या मुलींच्या नवऱ्यांना वचक बसवून त्या असहाय्यक गरीब मुलींना नांदावयाला लावणारे, आपला दलित समाज हेच आपले कुटुंब समजून ह्या कुटुंबासाठी समाजाला जगविण्यासाठी वाट्टैल ते करणारे , समाजपुरूष, दलितांचे कैवारी आणि बहुजन कष्टकरी, शेतमजूर, शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे अशा प्रकारचे नायक शंकरभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांचे विषय बनविले. पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रातील अशा नायक, नायिकांना एकत्र करून मोत्यांच्या माळेप्रमाणे शंकरभाऊंनी या नायक–नायिकांना कादंबरीच्या माळेत ओवले व ह्या मोत्यांच्या माळेचा कंठा मराठी साहित्य शारदेच्या गळयात घातला.

न्याय, समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधूत्व या चतुसूत्रीची बांधिलकी असणारे आणि मानवी मुलभूत गरजांच्या परिपूर्ततेसाठी वेळप्रसंगी समाजविघातक कृत्य करणारे, ध्येय प्राप्तीसाठी आपल्या भाव–भावनांना आवर घालून कर्तव्यपूर्ती करणारे क्षमताधिष्ठित मानवतावादी विचारसरणीचे असे शंकरभाऊंच्या साहित्याचे स्वरूप असल्याने शंकर भाऊ साठे हे माझे आदर्श व आवडते

साहित्यिक बनले. जे अनुभवले, जे पाहिले तेच लिहिले असा शंकरभाऊंचा विशेष असल्याने जो उपेक्षित आणि अंधारात होता त्याला सन्मान देऊन प्रकाशमान करण्यासाठीच शंकरभाऊंनी आपली लेखणी झिजवली. हा त्यांचा साहित्यिकगुण भावण्यासारखाच आहे. शंकरभाऊंच्या साहित्यात वास्तवता असते याची प्रचिती त्यांच्याच एका "लखू" नावाच्या कादंबरीचा नायक "लखू" याला भेटल्यावर आली. शंकरभाऊंच्या "सावळा" आणि "घमांडी" या दोन कादंबऱ्यांनी माझे लक्ष विशेष केंद्रित केल्याने याच दोन कादंबऱ्या मी एम.फिल. च्या लघु शोध प्रबंधासाठी निवडल्या.

आजअखेर शंकर भाऊ साठे यांच्या साहित्यावर कोणीही विपूल लेखन केल्याचे कोठेही आढळत नाही. शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा वाङ्‌मयीन रसास्वाद घेण्याच्या उत्कट इच्छेने व त्यांच्या वाङ्‌मयातील सौंदर्य शोधण्याच्या दृष्टीने मला त्यांच्यावर संशोधन करण्याची आवश्यकता भासली व त्यातूनच मी हा विषय लघु–शोध–प्रबंधासाठी निवडला.

शंकर भाऊंशी असणाऱ्या माझ्या नात्याच्या संबंधामुळे त्यांच्या हयातीत त्यांच्याशी केलेली चर्चा या ठिकाणी उपयुक्त तर ठरलीच परंतु त्यांच्या पश्चात त्यांचे पुतणे व अण्णाभाऊंचे चिरंजीव श्री.मधुकर अण्णा साठे व शंकर भाऊंचे नातू चि.सचिन याच्याशी केलेली बातचीत, "लखू" कादंबरीतील नायक "लखू" यांचेशी प्रबंध लेखनाच्या हेतून केलेली चर्चा आणि त्यातून मिळालेली माहितीसुध्दा या लघु–शोध–प्रबंधास उपयुक्त ठरली.

परिशिष्टामध्ये लेखक शंकर भाऊ साठे यांचा परिचय, त्यांचे जीवन कार्य, त्यांच्या साहित्यप्रपंच, मुलाखत, हस्ताक्षर, छायाचित्र या सोबतचे त्यांच्या "शामगांव" या अप्रकाशित असलेल्या कादंबरीच्या शंकर भाऊंच्याच हस्ताक्षरातील काही पानांचाही यामध्ये समावेश केलेला आहे.

प्रबंधिकेच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे. अशाप्रकारे लघु–शोध–प्रबंधास परिपूर्णता आणण्याचा मी कसोशीने व प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे.

## अनुक्रमणिका


| प्रकरण नं. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ नं. |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | प्रतिज्ञापत्र | |
| | प्रस्ताविक | |
| | भूमिका | |
| **प्रकरण पहिले :-** | | |
| | **अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांचे साहित्य व त्यांच्या साहित्य लेखनामागील प्रेरणा.** | 1 ते 12 |
| 1. | ग्रामीण आणि दलित साहित्याची वाटचाल. | |
| 2. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अल्पपरिचय. | |
| 3. | शंकर भाऊ साठे यांचा साहित्यप्रपंच. | |
| **प्रकरण दुसरे :-** | | |
| | **साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध.** | 13 ते 23 |
| 1. | साहित्य निर्मिती ही एक सांस्कृतिक घटना. | |
| 2. | कलावंत आणि समाज. | |
| 3. | साहित्याची समाज सापेक्षता. | |
| 4. | साहित्यातील भावनात्मकता. | |
| 5. | सामाजिक चळवळ आणि वाङ्मयनिर्मिती. | |

6. साहित्याचे सामर्थ्य

<u>प्रकरण तिसरे</u> :–

शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी वाड्.मयाची वैशिष्टये व त्यांचे एक दलित कादंबरीकार म्हणून ठळक असे वेगळेपण. 24 ते 56

1. ग्रामीण साहित्याचा विकास.

2. दलित साहित्याचा विकास.

3. दलित कादंबरी : स्वरूप आणि विचार.

4. दलित साहित्याच्या प्रेरणा.

5. कादंबरी : व्याख्या व स्वरूप.

6. दलित साहित्याचे स्वरूप.

<u>प्रकरण चौथे</u> :–

शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा" या कादंबरीचा वाङ्ःमयीन दृष्टीकोनातून अभ्यास 57 ते 78

1. कथानक.

2. कथानकाचा आशय.

3. व्यक्तिचित्रणे.

अ) सावळा

ब) विष्णूपंत कुलकर्णी

क) शंकरराव पाटील

ड) कुरूंदवाड सरकारच्या राणीसाहेब

इ) इतर पात्रे.

4. घटना – प्रसंग.

5. प्रादेशिकता.

6. वातावरणनिर्मिती.

7. भाषाशैली.

8. समारोप.

<u>प्रकरण पाचवे</u>

शंकर भाऊ साठे यांच्या "घमांडी" या कादंबरीचा

वाड्.मयीन दृष्टीकोनातून अभ्यास 79 ते 106

1. कथानक.

2. कथानकाचा आशय.

3. व्यक्तिचित्रणे.

अ) घमांडी

ब) राधा

क) जयराम चिंचणीकर

ड) इतर पात्रे.

4. घटना–प्रसंग.

5. प्रादेशिकता.

6. वातावरणनिर्मिती.

7. भाषाशैली.

8. समारोप.

प्रकरण सहावे :-

निष्कर्ष 107 ते 113

प्रकरण सातवे :-

उपसंहार 114 ते 117

परिशिष्ट 118 ते 132

1. लेखकाचे छायाचित्र व परिचय.
2. लेखकाच्या साहित्याचा परिचय.
3. लेखकाचे हस्ताक्षर.
4. लेखकाच्या हस्ताक्षरातील "शामगांव" या अप्रकाशित कादंबरीची काही पाने.
5. लेखकाच्या प्रकाशित असलेल्या "लखू" या कादंबरीच्या हयात असलेल्या नायकाचे छायाचित्र.
6. शंकर भाऊ साठे यांचे पूतणे आणि नातू यांची मुलाखत व छायाचित्र.

संदर्भ-ग्रंथ-सुची. 133 ते 134